लोकमत

# डॉ. सोनकवडे यांना भौतिकशास्त्रातील पेटंट जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. आर जी. सोनकवडे यांच्या नावे एक पेटंट जाहीर झाले आहे. 'मायक्रोवेव्ह इन्ड्यूसड् केमिकल एचिंग ऑफ एलआर-११५ टाईप २ सॉलिड स्टेट न्यूक्लीअर डिटेक्टर' या आविष्कारासाठी हे पेटंट नुकतेच घोषित झाले आहे.

प्रा. सोनकवडे यांनी आंतर विद्यापीठीय त्वरक केंद्र, दिल्ली या विज्ञान संस्थेमार्फत भारत सरकार दिल्लीकडे ११ वर्षापूर्वी अर्ज केला होता. प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे हे आंतर विद्यापीठीय केंद्र, दिल्ली येथे कार्यरत होते तेव्हापासून या आविष्कारावर अहोरात्र मेहनत घेत होते. मायक्रोवेव्ह लहरींचा वापर करून साधारणपणे किती किरणोत्साराची मात्रा एखाद्या व्यक्तीसाठी पुरेशी ठरेल व त्यामुळे न्यूक्लियर ट्रॅक व्यवस्थित रित्या पाहता येतील, हा त्यांच्या या आविष्काराचा विषय आहे. कॅन्सर पीडित रुग्ण असेल तर त्याला उपचार करताना किरणोत्सारी मात्रा जशी अचूक द्यावी लागते अगदी त्याचप्रमाणे येथे सुद्धा तशी काळजी घेणे अनिवार्य ठरते. तसेच चुकीच्या किरणोत्सर्ग मात्रेचे अनेक दुष्परिणाम हे मानवावर होऊ शकतात. याकरिता किरणोत्सर्गाचे अचूक प्रमाण कसे मिळवता येईल, यावरती प्रा. सोनकवडे यांनी बारकाईने लक्ष दिले.

02 NOV 2021 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



डॉ. पी.एस. पाटील, प्रा. सी.एच. भोसले, डॉ. ए.व्ही. मोहोळकर, डॉ. ए.व्ही. राव, डॉ. जे.पी. जाधव, डॉ. के.वाय. राजपुरे, डॉ. के.एम. गरडकर, डॉ. संजय लठ्ठे, डॉ. सुशीलकुमार जाधव

# जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे नऊ प्राध्यापक

## अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ताज्या क्रमवारीत पुनर्मानांकन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची ताजी यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली आहे. यात शिवाजी विद्यापीठाच्या नऊ संशोधकांना पुनर्मानांकन प्राप्त झाले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गतवर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीत विद्यापीठाच्या संशोधकांना स्थान लाभले होते. यंदाही त्यांना पुनर्मानांकन लाभले आहे. यंदा स्टॅनफोर्डने वेगवेगळ्या प्रकारच्या सूची जाहीर केल्या आहेत. त्यापैकी एक सूची संशोधकांच्या सार्वकालिक कारकिर्दीचा वेध घेऊन तयार केली आहे. दुसरी वार्षिक कामगिरीवर आधारित आहे. 'स्कोपस' डेटाबेसवर आधारित या यादीसाठी १९६० ते २०२१ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा विचार करण्यात आला आहे.

सार्वकालिक कामगिरीवर आधारित जाहीर केलेल्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील (पदार्थ विज्ञान), डॉ. केशव राजपुरे (पदार्थ विज्ञान), डॉ. ए.व्ही. राव (पदार्थ विज्ञान), प्रा. सी.एच. भोसले (पदार्थ विज्ञान) आणि डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र) यांचा समावेश आहे. वार्षिक कामगिरीवर आधारित यादीमध्येही संशोधकांचा समावेश आहे. डॉ. ए.व्ही. मोहोळकर (पदार्थ विज्ञान), डॉ. संजय लठ्ठे (नॅनो सायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनो सायन्स) व डॉ. के.एम. गरडकर (रसायनशास्त्र) यांचा समावेश आहे.

> ए.डी. सायंटिफिक इंडेक्स क्रमवारीपाठोपाठ सलग दुसऱ्या दिवशी विद्यापीठीय संशोधनाच्या जागतिक दर्जावर शिक्कामोर्तब करणारी वार्ता प्राप्त झाली आहे. या दोन्ही विभिन्न प्रकारच्या क्रमवारीमध्ये विद्यापीठाच्या संशोधकांनी स्थान प्राप्त करणे यातून संशोधनाचा बहुआयामी दर्जाही सिद्ध होतो.
>
> - डॉ. डी.टी. शिर्के, कुलगुरू

पुढारी

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील ११ विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील ११ विद्यार्थ्यांची टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या नामांकित मल्टिनॅशनल कंपनीत निवड झाली. त्यांना प्रत्येकी प्रतिवर्ष ३.४ लाख रुपयांचे पॅकेज देण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात बी.टेक. अंतिम वर्षात (२०२१-२२) शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी टीसीएस कंपनीमार्फत निवड चाचणी घेण्यात आली.

कॉम्प्युटर सायन्स व टेक्नॉलॉजी शाखेतून कोमल पुरोहित, तेजल आंबोळकर, श्रेयस पाटील व ओंकार चौगुले व केमिकल टेक्नॉलॉजी शाखेतील अंकेष चौगुले, मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेतून आशुतोष शिरोळेची निवड झाली आहे.

02 NOV 2021 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# जागतिक संशोधकांत विद्यापीठाचे ९ प्राध्यापक

## अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ताज्या क्रमवारीत पुनर्मानांकन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची ताजी यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली असून, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या नऊ संशोधकांना पुनर्मानांकन प्राप्त झाले आहे. यामध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा समावेश आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गतवर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीमध्येही शिवाजी विद्यापीठाच्या



पी. एस. पाटील

संशोधकांना स्थान लाभले होते. यंदाही त्यांना पुनर्मानांकन लाभले आहे. यंदा स्टॅनफोर्डने वेगवेगळ्या प्रकारच्या सूची जाहीर केल्या आहेत. त्यापैकी एक सूची संशोधकांच्या सार्वकालिक कारकीर्दीचा वेध घेऊन तयार केली आहे, तर दुसरी वार्षिक कामगिरीवर आधारित आहे. जाहीर केलेल्या यादीमध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ए. व्ही. राव , प्रा. सी. एच. भोसले (चौघेही पदार्थ विज्ञान) आणि डॉ. ज्योती जाधव (जैव रसायनशास्त्र) यांचा समावेश आहे. वार्षिक कामगिरीवर आधारित यादीमध्येही उपरोक्त संशोधकांचा समावेश आहेच. त्यांच्यासह डॉ. ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. संजय लठ्ठे, डॉ. सुशीलकुमार जाधव (दोघे नॅनो सायन्स) आणि डॉ. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र) यांचा समावेश आहे.

'स्कोपस' डेटाबेसवर आधारित या यादीसाठी १९६० ते २०२१ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा विचार करण्यात आला आहे. २२ विज्ञान विषय आणि १७६ उपविषयांमधील संशोधनाची दखल त्याअंतर्गत घेतली गेली आहे. शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधन पत्रिकेचा दर्जा, शोधनिबंधाला प्राप्त झालेली सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वतःची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा अनेक काटेकोर निकषांवर आधारित ही यादी जाहीर केली जाते.

02 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कार्यक्षेत्रातील संशोधकांची आंतरराष्ट्रीय मोहर

## ४८ जणांना 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२१' मध्ये स्थान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठातील प्रा. मूरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर या दोघांनी संयुक्तपणे 'आल्पर-डॉजर सायंटिफीक इंडेक्स' तथा 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केलेला आहे. यात शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधकांना स्थान मिळाले आहे. इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स या विषयांचे प्रत्येकी ३, प्राणीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, धातूविज्ञान, अन्नविज्ञान व फार्मसी या विषयांचे प्रत्येकी दोन आणि गणित व संगणकशास्त्राचे प्रत्येकी एख असे एकूण ४८ आजी-माजी संशोधक समाविष्ट आहेत.



### निवड झालेले संशोधक

डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. एन. आय. तरवाळ, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. टी. जे. शिंदे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. ए. बी. गडकरी, डॉ. विजया पुरी, डॉ. सोनल चोंदे, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. एम. बी. देशमुख, डॉ. डी. एच. दगडे, डॉ. गजानन राशीनकर, डॉ. अनंत दोड्डमणी; डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. श्रीमती एन. एस. चव्हाण, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. ज्योती जाधव, डॉ. नीरज राणे, डॉ. एम. व्ही. शांताकुमार, डॉ. टी. व्ही. साठे, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. पंकज पवार, डॉ. पी. बी. दंडगे, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. आर. आर. मुधोळकर, डॉ. एस. बी. सादळे, डॉ. एन. आर. प्रसाद, डॉ. किरण कुमार शर्मा, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. विजय कोरे, डॉ. ए. के. साहू, डॉ. राहुल रणवीर, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. के. डी. कुचे, डॉ. जॉन डिसुझा, डॉ. संतोष पायघन.

जनसंपर्क कक्ष
02 NOV 2021
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्टॅनफोर्ड'च्या यादीत विद्यापीठाचे नऊ संशोधक

**कोल्हापूर, ता. १ :** जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची ताजी यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली. त्यात विद्यापीठाच्या नऊ संशोधकांना पुनर्मानांकन प्राप्त झाले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गेल्यावर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीतही शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना स्थान लाभले होते. यंदाही त्यांना पुनर्मानांकन लाभले आहे. यावर्षी स्टॅनफोर्डने वेगवेगळ्या सूची जाहीर केल्या आहेत. त्यापैकी एक सूची संशोधकांच्या कारकिर्दीचा वेध घेऊन तयार केली आहे.

**सार्वकालिक कामगिरी**

प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील (पदार्थविज्ञान), डॉ. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. सी.एच. भोसले (पदार्थविज्ञान), डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र).

**वार्षिक कामगिरी**

डॉ. ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. संजय लठ्ठे (नॅनो सायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनो सायन्स), डॉ. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र).

**निवडीचे निकष**

'स्कोपस'डेटाबेसवर आधारित यादीसाठी १९६० ते २०२१ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा विचार केला आहे. शोधनिबंधांची संख्या, दर्जा, सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वतःची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा निकषांवर यादी जाहीर केली जाते.

सकाळ

# प्रा. डॉ. सोनकवडे यांच्या संशोधनाला मिळाले पेटंट

## तब्बल ११ वर्षांची प्रतीक्षा आली फळाला



सोनकवडे

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. आर जी. सोनकवडे यांच्या नावे 'मायक्रोवेव्ह इंड्युस्ड केमिकल इनिंग ऑफ एल आर -११५ टाईप सेकंड सॉलिड स्टेट न्युक्लिअर डिटेक्टर' संशोधनासाठी नुकतेच पेटंट घोषित झाले. त्यांनी अपुऱ्या आर्थिक निधीमुळे पेटंटसाठी दिल्ली येथील आंतर विद्यापीठीय त्वरक केंद्रातर्फे सरकारकडे अर्ज पाठवला होता. तब्बल अकरा वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर त्यांना पेटंट मिळाले.

मायक्रोवेव्ह लहरींचा वापर करून साधारणपणे किती किरणोत्साराची मात्रा एखाद्या व्यक्तीसाठी पुरेशी ठरेल व त्यामुळे न्यूक्लियर ट्रॅक व्यवस्थितरित्या पाहता येतील, हा त्यांच्या संशोधनाचा विषय. ते न्युक्लिअर ट्रॅक व्यवस्थित पाहता आले तरच किरणोत्सर्गाची मात्रा अचूक प्रमाणात दिली गेली आहे की नाही, हे समजू शकते. किरणोत्सर्गाचे अचूक प्रमाण कसे मिळवता येईल, यावर लक्ष दिले. यासाठीचा खर्च तत्कालीन संचालक डॉ. अमित रॉय यांनी केंद्रातर्फे केला. पेटंटसाठी चाचण्या व त्यांचे अहवाल संस्थेच्या दिल्ली कार्यालयात द्यावे लागतात. यात येणाऱ्या अनेक अडचणींपैकी मायक्रोवेव्हचे ट्रे व बाऊल यांना किरणोत्सारामुळे तडे जायचे. त्यांना तसे न होण्यासाठी त्यांनी खूप मेहनतीच्या जोरावर यश मिळवले.

### पेटंटचे श्रेय सहकाऱ्यांना

पेटंटसाठीच्या अर्जास भारत सरकार संस्थेतर्फे स्वीकृती मिळत नव्हती. यातील बराच भाग धोरणात्मक व बचावात्मक क्षेत्राशी संबंधित होता. पेटंट मिळाल्यावर डॉ. सोनकवडे यांनी त्याचे श्रेय संशोधक विद्यार्थी व सहकाऱ्यांसह प्रशासकीय वर्ग, भौतिकशास्त्र अधिविभागास दिले.

02 NOV 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ए. डी. सायंटिफिक इंडेक्सच्या क्रमवारीत कुलगुरुंसह ४८ संशोधक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जागतिक पातळीवरील 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स–२०२१' तर्फे जाहीर केलेल्या जागतिक संशोधकांच्या अद्यावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह एकूण ४८ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश झाला आहे. यात स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक आहेत.

अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठातील प्रा. मूरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर या दोघांनी संयुक्तपणे 'आल्पर–डॉजर सायंटिफीक इंडेक्स' तथा 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केला आहे. त्यांनी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच–इंडेक्स, आय–टेन इंडेक्स हे निर्देशांक तसेच सायटेशन स्कोअर आदींचे पृथक्करण केले.





**क्रमवारीत स्थान लाभलेले संशोधक :** संख्याशास्त्र– डॉ. डी.टी. शिर्के, पदार्थविज्ञान, मटेरियल सायन्स व धातूविज्ञान– डॉ. पी.एस. पाटील, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. एन.आय. तरवाळ, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. टी. जे. शिंदे (के.आर.पी. महाविद्यालय, इस्लामपूर), डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. ए. बी. गडकरी (गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालय), डॉ. विजया पुरी (धातूविज्ञान), डॉ. सोनल चोंदे (धातूविज्ञान व मटेरियल सायन्स) रसायनशास्त्र– डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. जी.बी. कोळेकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. एम. बी. देशमुख, डॉ. डी. एच. दगडे, डॉ. गजानन राशीनकर, डॉ. अनंत दोड्डमणी, वनस्पतीशास्त्र– डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एन. एस. चव्हाण, डॉ. डी. के. गायकवाड. जैवतंत्रज्ञान व बायोरिमिडिएशन– डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. ज्योती जाधव, डॉ. नीरज राणे. प्राणीशास्त्र– डॉ. एम. व्ही. शांताकुमार, डॉ. टी. व्ही. साठे. जैवरसायनशास्त्र– डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. पंकज पवार, डॉ. पी. बी. दंडगे. इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स – डॉ. पी. एन. वासंबेकर (इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. टी.डी. डोंगळे (नॅनो–इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. आर. आर. मुधोळकर (इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी). नॅनोसायन्स व तंत्रज्ञान– डॉ. एस. बी. सादळे, डॉ. एन.आर. प्रसाद, डॉ. किरण कुमार शर्मा. पर्यावरणशास्त्र–डॉ. पी. डी. राऊत (पर्यावरणशास्त्र), डॉ. विजय कोरे (पर्यावरण अभियांत्रिकी). अन्नविज्ञान व अभियांत्रिकी–डॉ. ए. के. साहू, डॉ. राहुल रणवी. संगणकशास्त्र– डॉ. एस. आर. सावंत. गणितशास्त्र– डॉ. के. डी. कुचे. फार्मसी–डॉ. जॉन डिसुझा (तात्यासाहेब कोरे फार्मसी महाविद्यालय, वारणानगर), संतोष पायघन.

02 NOV 2021
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक संशोधकात विद्यापीठाचे नऊ प्राध्यापक

## अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ताज्या क्रमवारीत पुनर्मानांकन

प्रतिनिधी
कोल्हापूर

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या नऊ संशोधकांना पुनर्मानांकन प्राप्त झाले आहे. या संशोधकांच्या यशामुळे शिवाजी विद्यापीठाचे नाव जगात सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गत वर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी स्थान प्राप्त केले आहे. यंदा स्टॅनफोर्डने वेगवेगळ्या प्रकारच्या सूची जाहीर केल्या आहेत. त्यापैकी एक सूची संशोधकांच्या संपूर्ण कारकीर्दीचा वेध घेऊन तयार केली आहे, तर दुसरी वार्षिक कामगिरीवर आधारित आहे.



डॉ. पी. एस. पाटील



डॉ. केशव राजपुरे


डॉ. ए. व्ही. राव


प्रा. सी. एच. भोसले


डॉ. ज्योती जाधव


डॉ. ए. व्ही. मोहोळकर


डॉ. संजय लट्ठे


डॉ. सुशीलकुमार जाधव


डॉ. के. एम. गरडकर

संपूर्ण कारकीर्दीवर आधारित जाहीर केलेल्या यादीमध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील (पदार्थविज्ञान), डॉ. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. सी. एच. भोसले (पदार्थविज्ञान) आणि डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. संजय लट्ठे (नॅनो सायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनो सायन्स) आणि डॉ. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र) यांचा समावेश आहे. 'स्कोपस' डेटाबेसवर आधारित या यादीसाठी १९६० ते २०२१ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा विचार करण्यात आला आहे. २२ विज्ञान विषय आणि १७६ उपविषयांमधील संशोधनाची दखल त्याअंतर्गत घेतली गेली आहे. शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधन पत्रिकेचा दर्जा, शोधनिबंधाला प्राप्त झालेली सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वतःची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा अनेक निकषांवर ही यादी जाहीर केली आहे.

### विद्यापीठातील संशोधन जागतिक दर्जाचे

ए. डी. सायंटिफिक इंडेक्स क्रमवारीपाठोपाठ सलग दुसऱ्या दिवशी विद्यापीठीय संशोधनाच्या जागतिक दर्जावर शिक्कामोर्तब करणारी वार्ता प्राप्त झाली आहे. या दोन्ही विभिन्न प्रकारच्या क्रमवारीमध्ये विद्यापीठाच्या संशोधकांनी स्थान प्राप्त केले. यातून शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाचा बहुआयामी दर्जाही सिद्ध झाला आहे. सर्व संशोधकांचे विद्यापीठातर्फे अभिनंदन करताना आनंद होत आहे.

– कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

तरुण भारत

# पदवी व पदव्युत्तर परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी परीक्षांचे अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. तरी पदवी व पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांनी विनाविलंब शुल्कासह १२ ते २६ दरम्यान अर्ज भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान अर्ज भरावयाचा आहे. तर अतिविलंब शुल्कासह ४ ते ७ डिसेंबर दरम्यान अर्ज भरावयाचा आहे. तर महाविद्यालयांनी विनाविलंब शुल्कासह २९ नोव्हेंबर, विलंब शुल्कासह ४ डिसेंबर आणि अतिविलंब शुल्कासह ९ डिसेंबरपर्यंत अर्जांची यादी सादर करावयाची आहे. परीक्षा अर्जासंदर्भात सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

02 NOV 2021 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# केशवराव जेधे हे विसाव्या शतकातील तेजस्वी पर्व

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. अरूण भोसले यांचे मत : डॉ. उषा मेहता ऑनलाईन व्याख्यानमाला

प्रतिनिधी
कोल्हापूर

विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय जीवनातील केशवराव जेधे हे तेजस्वी पर्व होते. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची योग्य दखल घेतल्याखेरीज आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास पूर्ण होणे अशक्य आहे, असे मत ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. अरुण भोसले यांनी मांडले. शिवाजी विद्यापीठात गांधी अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित 'डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमाला' अंतर्गत 'देशभक्त केशवराव जेधे : कार्यकर्तृत्व' यावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ होते.

ते म्हणाले, जनमानसावर व्यक्तिमत्त्वांचा तेजस्वी प्रभाव जेधे यांनी प्रस्थापित केला. ते बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. निर्भयता,



प्रामाणिकपणा ही त्यांच्या वक्तृत्व, लेखनाची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या जीवनकर्तृत्वाचें चार टप्पे होतात. प्रारंभी सत्यशोधक, ब्राह्मणेतर चळवळीचे त्यांनी नेतृत्व केले. त्यानंतर त्यांनी काँग्रेसच्या माध्यमातून राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व केले. पुढे काँग्रेसमधून बाहेर पडून १३ मे १९४८ रोजी तुळशीदास जाधव, शंकरराव मोरे यांच्या साथीने भारतीय शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. १९५४ मध्ये ते काँग्रेसमध्ये परतले. यावेळी त्यांना दुय्यम स्थान लाभले असेल, मात्र जनमानसावरील त्यांचा प्रभाव, सन्मान हा १२ नोव्हेंबर १९५९ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेईपर्यंत कायम राहिला.

किशोर बेडकीहाळ म्हणाले, जेधे यांचे जहालपण सुधारणांच्या बाजूने, सुधारणांसाठीचे होते, हे लक्षात घ्यावे लागेल. त्यांचे नेतृत्व हे तत्कालीन सार्वजनिक जीवनात म्हणूनच उठून दिसणारे आहे. जेधे हे हाडाचे कार्यकर्ते होते.

गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी पाटील यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. एस. एस. महाजन, अशोक बाबर, डॉ. बी. एम. हिर्डेकर, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अरुण शिंदे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत

# ७३ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**कोल्हापूर :** सीपीआर रूग्णालयात रक्ताचा तुटवडा असल्याने सीपीआरने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठ आजी–माजी विद्यार्थी संघटना आणि सीपीआर रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहातील आयोजित रक्तदान शिबिरात ७३ रक्तदात्यांनी रक्तदान करीत सामाजिक बांधिलकी जपली आहे. विद्यापीठाच्या आजी–माजी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

- **शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम**



कोल्हापूरच्या छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालयामध्ये रक्तांचा तुटवडा होता. शिवाजी विद्यापीठातील आजी–माजी विद्यार्थ्यांनी अयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामुळे सीपीआरमधील एखाद्या सामान्य माणसाची गरज पूर्ण होवून एखाद्याचे प्राण वाचतील. या विचाराने आयोजित रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. १२५ लोकांनी शिबिराला भेट दिली तर ७३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे आयोजन विद्यापीठातील विद्यार्थी सुनिल दळवी, प्रदीप बोभाटे, राम चव्हाण, दत्तात्रय कदम, विनायक रेडेकर, मतीन शेख, अमित लाड, अभिजीत शिंदे, पंकज पाटील, अर्जून पाटील, तुषार हसुरकर, गोविंद गावडे यांनी केले.